तरुण भारत

# शोधनिबंधांच्या पुस्तकाचे प्रकाशन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात झालेल्या ऑनलाईन आंतरराष्ट्रीय परिषदेत सादर करण्यात आलेल्या निवडक शोधनिबंधांच्या पुस्तकाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. शिवाजी विद्यापीठाच्या बेटी बचाओ अभियान, विद्यार्थी विकास विभाग आणि केरळ येथील सनातन धर्म महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने फेब्रुवारीमध्ये 'Gender: Technology and Empowerment Post 1990" या विषयावर दोन दिवसीय ऑनलाईन आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत सादर करण्यात आलेल्या शोधनिबंधांपैकी ४५ उत्कृष्ट शोधनिबंधाचे पुस्तक तयार करण्यात आले. यावेळी प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर व्ही गुरव, अभियानाच्या समन्वयक डॉ. पी. बी. देसाई, डॉ. एन. एल. तरवाळ अभियानाचे सर्व अधिविभागीय समन्वयक आदी उपस्थित होते.

01 DEC 2021 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समाजाभिमुख उद्योग निर्मितीसाठी विद्यार्थ्यांनी प्रयत्न करावेत

## प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांचे प्रतिपादन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

प्रत्येकाला आज नोकरी मिळणे कठीण होऊन बसले आहे. अशा परिस्थितीत युवक विद्यार्थी उद्योगाकडे वळताना आपणास पाहावायास मिळत आहे. अशा वेळी उद्योगाची निवड ही समाजाभिमुख असल्यास उद्योगच्या यशस्वी वाटचाल सुलभ होईल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी केले.

विद्यापीठ कौशल्य व उद्योजकता विकास संशोधन व विकास केंद्र यांच्या विद्यमाने आयोजित 'उद्योगाची नवी कल्पना' स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते.

डॉ. देशमुख म्हणाले, तळागाळातील खेडोपाड्यातील सर्वसामान्य नागरिक, छोटे उद्योजक, व्यावसायिक आणि विद्यार्थी यांच्याकडे अनुभवातून किंवा कल्पनेमधील अनेक नवसंकल्पना असतात. अशा सुप्त नव संकल्पनांना मंच प्रदान करण्याच्या हेतूने विद्यापीठाने विद्यार्थ्यांच्या नवीन कल्पनाना प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारले आहे. प्रास्ताविक कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे संचालक प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांनी केले. ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ डॉ. पी.डी. राऊत व ज्येष्ठ उद्योजक कृष्णा गावडे यांनी परीक्षक म्हणून काम पहिले. महेश चव्हाण यांनी आभार मानले.

स्पर्धेत ८७ नाविन्यपूर्ण संकल्पनांचे प्रस्ताव प्राप्त झाले. या प्रस्तावांचे व्यवस्थापन, मॅकेनिकल व ऊर्जा, माहिती तंत्रज्ञान व संगणक, अन्न व प्रक्रिया, कृषी, पर्यावरण व पर्यटन आणि आरोग्य अशा क्षेत्रातील कल्पना विषयतज्ज्ञांसमोर सादर करण्यात आल्या.